उपजिल्हा रुग्णालय, तिरोडा, जि.गोंदिया येथील दंतचिकित्सा विभागातील दंत शल्य चिकित्सक,गट-अ चे १ अस्थाई पद पुढे चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः पदआ - २०१७ /प्र.क्र. १७३/आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०६ नोव्हेंबर,२०१७

वाचा -

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक -पदआ २०१७/प्र.क्र.१७३/आरोग्य -३, दिनांक- २६.०६.२०१७.

२) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/मौ.आ./टे-५/अपदे-१/३३५३-५४/१७,दिनांक-०६.०७.२०१७.

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उपजिल्हा रुग्णालय, तिरोडा, जि.गोंदिया येथील दंत शल्य चिकित्सक,गट-अ या १ अस्थाई पदास दि.०१.०३.२०१७ ते दि.३०.०९.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

२. आता या शासन निर्णयान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांच्या अधिपत्याखालील उपजिल्हा रुग्णालय, तिरोडा, जि.गोंदिया येथील दंत शल्य चिकित्सक,गट-अ या १ अस्थाई पदास दि.०१.१०.२०१७ ते दि.३१.१२.२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२) मागणी क्रमांक-आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - सार्वजनिक आरोग्य
००१ - संचालन व प्रशासन

(०१) (०९) - महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकलपांतर्गत ग्रामिण/कुटीर रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन . (२२१० ४६२४)

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्रमांक,पदनि-२०१६/प्र.क्र.८/आपुक,दिनांक- ०३.१०.२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०११५५९०४२२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.06 14:57:59 +05'30'

(रो.दि.कदम-पाटील)
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये-राज्यस्तर) मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय,गोंदिया.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया.
८. वैद्यकीय अधिक्षक,उपजिल्हा रुग्णालय, तिरोडा जि.गोंदिया.
९. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
११. निवडनस्ती (आरोग्य-३)